❖ प्रकरण १ ❖

# डॉ.सूर्यकांत खांडेकर आणि मराठी कविता

## प्रकरण १ ले

# डॉ. सूर्यकांत खांडेकर आणि मराठी कविता

काव्य हे समाजाच्या संवेद्य विश्वाची क्षितीजे विस्तारत नेणारे एक सर्जनशील साधन आहे. मराठी कवितेला सुमारे सातशे वर्षांची परंपरा आहे. या प्रदीर्घ परंपरेने आपल्या संवेद्य विश्वाचा आशय व आकार अखंडपणे उघड करण्याचे कार्य पार पाडले आहे. हे परंपरानिर्मित संवेद्य जग कशाप्रकारचे आहे याचा सांख्यिकीय व गुणात्मक मागोवा घेणे मोठे उद्बोधक ठरेल. मराठी काव्य परंपरेने केवळ रुपाचे रुप नव्हे तर अरुपाचेही रुप दाखवण्याची प्रतिज्ञा तेराव्या शतकातच ज्ञानेश्वरांच्या तोंडून उद्घोषीत केली हे आपण जाणतोच. आपल्याकडील मराठी काव्याची परंपरा सामान्यत: संत, पंत, तंत अशा क्रमाने पहावयास मिळते. आपण तीला पारमार्थिक वळणाची व मध्ययुगीन जाणिवेची जुनी कविता म्हणतो. तेथून पुढे अर्वाचिन कवितेचा कालखंड सुरु होतो. या दोन्ही कालखंडातील परंपरेशी झगडा करीत आणि या परंपरेतील गुणविशेष शोषून घेत आजची कविता निर्माण झाली आहे. त्यामुळे आजच्या कवितेतील प्रेरणा, प्रवृत्तींचा विचार करताना तिच्या पूर्वपरंपरेवर धावता दृष्टीक्षेप टाकावा लागेल. कवितेचा संबंध विचारांपेक्षा संवेदनशीलतेशी अधिक असतो. आपली संवेदनशीलता पुरातन, पारमार्थिक शिकवणीने आणि सातशे वर्षांच्या काव्यपरंपरेने संस्कारीत झाली होती. संत, पंत, शाहीर आणि लोकवाङ्:मय यांच्या काव्याचे ते संस्कार होते. या संस्कारांची मळलेली पाऊलवाट सुटून आपल्या कवितेला वेगळे आधुन्कि वळण मिळायला एकोणीसाव्या शतकाची अखेर व्हावी लागली.

सन एकोणीसशे साठ पूर्वीची व साठोत्तरी कविता ही पूर्वकालीन परंपरेशी जवळीकता साधणारी, नविनता निर्माण करणारी, काव्याचे काव्यत्व अबाधीत

राखणारी आहे. सन एकोणीसशे साठ नंतरच्या मराठी कवितेत प्रामुख्याने अनियतकालीकांची चळवळ दलितकविता, ग्रामीण कविता हे प्रवाह दिसून येतात.

या प्रवाहात अरूण कोल्हटकर, भालचंद्र नेमाडे, वसंत आबाजी डाहाके, दिलीप चित्रे, नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ, दया पवार मर्ढेकर, सूर्यकांत खांडेकर आदींनी मोलाची भर घातली.

या काळात ना. धो. महानोरांची कविता वेगळ्या ग्रामीण शैलीत अवतरली, नामदेव ढसाळ, नारायण सुर्वे, दया पवार या कवींनी मार्क्सवादी व अरुण कोल्हटकर, वसंत आबाजी डाहाके यांनी महानगरी वास्तवाचे दर्शन घडविले. अशाप्रकारे मराठी काव्यप्रवाह विविध अंगांनी समृध्द झाला. या संदर्भात प्रा. रवींद्र घवी यांचे विधान महत्वपूर्ण आहे.

''या काळात सातशेच्यावर कवींचे दीडहजारांवर कवितासंग्रह प्रसिध्द झाल्याचे दिसून येते. संख्यात्मक दृष्टीने विचार केल्यास या काळात मराठी कवितेला जेवढा बहर आला तेवढा यापूर्वीच्या कोणत्याही काळात आला नव्हता.''[१]

आधुनिक मराठी कवितेत एक मार्ग मर्ढेकरांचा दुसरा सुर्व्यांचा तर तिसरा चित्र्यांचा बघायला मिळतो. या कालखंडात मर्ढेकर, चित्रे, सुर्वे, मुक्तीबोध, अमरशेख, आण्णाभाऊ साठे यांसारखे अनेक महत्वूपर्ण कवी झाले मात्र यातील फक्त मर्ढेकर, चित्रे व सुर्वे यांच्या कवितेबद्दलच प्रातिनिधिक स्वरुपात मी इथे चर्चा करणार आहे. कारण या प्रकरणात डॉ. सूर्यकांत खांडेकर यांच्यावरच अधिक भर देण्यात येणार आहे.

## आधुनिक मराठी कवितेतील प्रमुख प्रातिनिधिक कवी -

### १. बाळ सिताराम मर्ढेकर ... (१ डिसेंबर १९०९ ते २० मार्च १९५६ )

साधारण १९४५ पासून आधुनिक मराठी कवितेची सुरुवात मानली जाते. मराठी काव्याच्या या युगाला मर्ढेकर युग असेही संबोधले जाते. मराठी काव्यातील नवकाव्याच्या प्रवाहाचे प्रणेतेपद मर्ढेकरांकडे जाते. नवकवी म्हणून मर्ढेकरांचा विशेष बोलबाला होण्याचे कारण म्हणजे मर्ढेकरांच्या काव्यातील मानवी जीवनदर्शन, त्यातील उपरोध प्रतिमा आणि त्यांच्या लकबीची वक्रता होय. मर्ढेकरांचे 'शिशिरागम', ' काही कविता', 'आणखी काही कविता' हे महत्त्वाचे कविता संग्रह आहेत. केशवसुतांच्या व्यापकतेशी आणि वृत्ती गांभीर्याशी नाळ तुटलेली मर्ढेकर पूर्व कविता आपल्या संकूचित अनुभव विश्वामध्ये रममाण झाली असताना आपल्या उपजत बंडखोरीने व विलक्षण प्रतिभासामर्थ्याने मर्ढेकरांनी तिला प्रचंड तडाखा दिला. केशवसुतांनंतर इतकी सजग काव्यदृष्टी असणारा दुसरा कवीच मधल्या कालखंडात निर्माण झाला नाही. मर्ढेकरांजवळ एक समग्र साहित्यदृष्टी होती. तिचा परिणाम त्यांच्या निर्मितीवर झाला आहे आणि याचा प्रभाव त्यांच्या समकालीन आणि उत्तरकालीन कवींवर पडलेला दिसतो.

मर्ढेकरांच्या काव्यात टोकाची निराशा आणि वैफल्य असले तरी त्याचे आदिकारण जीवनविषयक तुच्छता नाही, तर जीवन विषयक आस्था आहे. शुचिता, मांगल्य आणि माणूसकी यांची विटंबना पाहून हृदयात निर्माण झालेल्या वैफल्याचे जळजळीत रसायन त्यांच्या कवितेत प्रकट झाले आहे. मर्ढेकरांच्या कवितेत बंडखोरी असली आणि समकालीन वाचकांना तिने प्रचंड धक्का दिलेला असला तरी त्यांचा मुळ पिंड आध्यात्मिक व संतसदृष्य जाणिवांचाच होता. त्याला यंत्रयुगीन मानवाची हतबलता आणि नैतिक सामर्थ्य यांच्या परस्पर मिश्रणाचे बळ मिळाले होते. प्रयोगशील आविष्कारांच्या स्तिमित करून टाकणाऱ्या तऱ्हा मर्ढेकरांनी हाताळल्या व काव्यप्रांतात यशस्वी केल्या.

जसे सामान्य आणि मध्यमवर्गीय माणसाच्या क्षुद्रतेचे वर्णन करताना कवी म्हणतो–

''पिपांत मेले ओल्या उंदिर
माना पडल्या, मुरगळल्याविण
ओठावरती ओठ मिळाले
माना पडल्या आसक्तीविण
गरीब बिचारे जगले
पिंपात मेले उचकी देऊन.''          २

इंग्रजी काव्यातील नानाविध प्रयोगांची छाया मर्ढेकरी कवितेत असली तरी आपल्या मराठी रोपट्याची हेळसांड मर्ढेकरांनी कधीच होऊ दिली नाही. ज्ञानेश्वर, तुकारामांच्या मराठीला त्यांनी आपल्या नव्या आविष्कारांचे लेणे चढविले. मर्ढेकर युगकवी होते. त्यांनी आपल्या युगाची संवेदना जाणिवपूर्वक व्यक्त केली ती जाणिव त्यांच्या वाङ्मयाच्या दिर्घ व्यासंगातून व्यक्त होत गेली. १९४५ नंतरच्या काव्यावर मर्ढेकरांचा प्रचंड प्रभाव आहे.

## २) नारायण गंगाराम सुर्वे . . . .(१९२६)

मराठी कवितेत सुर्व्यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. स्वत: कामगार असल्यामुळे 'जसा जगत आहे तसाच शब्दात आहे' म्हणतच त्यांचा काव्यप्रवास सुरू झाला. नारायण सुर्वे हा केवळ साम्यवादी कवितेतच नव्हे तर एकूण मराठी काव्याचाच महत्त्वपूर्ण टप्पा आहे. त्यांचे ' ऐसा गा मी ब्रम्ह' १९६३, ' जाहीरनामा'१९७५, 'सनद' १९८२, नव्या माणसाचे आगमन ' १९९५ आणि 'माझे विद्यापीठ' १९९५ हे काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. नारायण सुर्वे हे उघड साम्यवादी कवी असल्यामुळे त्यांच्या कवितेत ही जाणिव शोधावी लागत नाही.

सुर्व्यांच्या कवितेतील आशयगाभ्यांचे आकलन मार्क्सवादी विचारकेंद्रातून जन्मास आले असले तरी ते तिथेच थांबत नाही तर अर्थाच्याही पलीकडे असणाऱ्या मानवाच्या

चिरंतन सुखदु:खप्रवासाची व जीवनातील हेतूपूर्णतेची त्यांना जाणिव आहे. सुर्वे आपल्या जीवनातील मार्क्सवादाचे महत्त्व अमान्य करीत नाहीत पण त्याचबरोबर मानव आणि कला याचे महत्त्वही अमान्य करीत नाहीत. सुर्व्यांची जाणिव एकदम सुस्पष्ट असल्यामुळे तिने मार्क्सवादाकडून मानवतावादापर्यंत आपली वाटचाल केली आहे. सुर्व्यांचा विषय शेवटी माणूस हाच असल्याने त्यांच्या प्रतिमेत कलाकुसर नसते. तिला वास्तवाचे दर्शन घडवायचे असल्यामुळे परखडपणा तिचा आत्मा असतो जसे –

उदा. " सवाल एक होता तुमचा अमुचा ; रोटी हवी जिंदगी हवी
अजुनही सवाल तोच आहे तुमचा अमुचा ; रोटी हवी जिंदगी हवी." ३

सुर्व्यांनी कवितेत स्पष्टता आणण्याकरिता वास्तवाचे टोकदार वर्णन करणाऱ्या प्रतिमा वापरल्या. मानवतावाद हा सुर्वेंच्या कवितेचा विशेष गुण आहे.

## ३) दिलीप चित्रे (१७ सप्टेंबर १९३८)

१९५६ ला मर्ढेकर गेले. नवकवितेच्या पहिल्या पिढीचे नेतृत्व संपले ; ते स्वीकारण्याची जबाबदारीच चित्र्यांनी घेतली. १९६० ला चित्र्यांचा 'कविता' हा संग्रह प्रकाशित झाल आणि मर्ढेकरी परंपरेला एक नवे परिमाण मिळाले असल्याची जाणीव झाली. हे परिमाण अस्तित्ववादी जीवनदर्शनाचे होते. चित्रे कवितेला मानवी चेतनेच्या अर्थपूर्ण अभिव्यक्तीचे साधन मानत असल्यामुळे त्यांना ज्ञात असलेल्या आणि ढवळून टाकणाऱ्या जीवनाच्या सर्व स्तरांपर्यंत त्यांची व्याप्ती जाऊन पोहोचते. म्हणूनच व्यक्तिगत जीवनाच्या खोल तळापासून सभोवतालच्या युगीन परिवर्तनाची छाया त्यांच्या कवितेवर पडली आहे. अर्थातच भाबड्या आंधळेपणाने किंवा विशिष्ट जाणिवेने सभोवतालच्या समुहमनाच्या प्रतिक्रिया चित्र्यांच्या कवितेत उमटत नाहीत. समुहाचे आकलन समुहपातळीवर न होता स्वत:च्या अस्तित्व शोधाशी त्याचा सांधा जुळविला जातो.
चित्रे आपल्या आत्मनिवेदनात म्हणतात ...

"इतर सर्व मनुष्यांप्रमाणेच माझा जन्म माझ्या स्वत:च्या परवानगीने झाला नाही पण तो झाल्यानंतरची माझी सगळी धडपड स्वत:चे अस्तित्व मुक्त आणि श्रेयस्कर

करण्यासाठी झालेली आहे. ... आपण मर्त्य आहोत. याची मला जाणिव असते. अस्तित्वभान म्हणजे जगावेसे वाटणे, आपण मरतो हे ठाऊक असणे आणि प्रेम करणे, या तीन गोष्टींमुळे प्रत्येक अनुभवाची उत्कटता, मग तो अस्तित्व विडंबनाचाही प्रत्यय का असेना आपल्याला अनुभवावीशी वाटते. लेखन हा त्यावर आधारलेला विधी आहे. बाह्य पदार्थात आपल्या गतिमान अस्तित्वभावाची सिंबॉलिक ट्रान्सफर करणे ही कलेची मूळ प्रेरणा आहे.'' ४

आणि म्हणूनच कदाचित चित्र्यांनी स्त्रीपुरुष मिलनाच्या क्षणाला आपल्या कवितेत महत्त्वाचे स्थान दिले आहे. त्यातून त्यांचे इच्छा चिंतनही कदाचित व्यक्त होत असेल. स्त्रीदेहाविषयीचे जन्मजात कुतुहल त्यांच्या सौंदर्यकांक्षी मनाने स्त्रीच्या विविध रुपदर्शनातून पुरवून घेतल्याचे दिसते.

'एकूण कविते ' मध्ये चित्रे अधिकाधिक आध्यात्मसंमुख होत असताना दिसतात. अफाट महानगरे पाहून त्यातील विविधरंगी जीवनानुभव पचवून शेवटी देश्यभाव जपण्याकडे त्यांची प्रवृत्ती झाली. ज्ञानेश्वर, तुकारामांच्या काव्यग्रंथांच्या अनुवादाच्या निमित्ताने त्यांचा कल उपासनेकडे वळलेला दिसतो. सगुण निर्गुणाचा स्पर्श त्यांच्या कवितेला होत असल्याचे दिसते.

## डॉ. सूर्यकांत खांडेकर आणि मराठी कविता

काव्याचे जीवनातील स्थान फार महत्त्वाचे आहे. मराठी काव्यक्षेत्र समृध्द करण्याचा प्रयत्न ज्या प्रतिभावंतांनी केला त्यांच्यामध्ये डॉ. सूर्यकांत खांडेकर यांचे नाव निश्चित घ्यावे लागेल. त्यांनी कविता, गद्य, स्फूट लेखन, संपादन अशा सर्वच साहित्यप्रकारात आपला वेगळा असा ठसा उमटविला आहे.

## जीवन परिचय -

डॉ. सुर्यकांत खांडेकर यांचा जन्म २ एप्रिल १९२६ रोजी एका सामान्य कुटुंबात झाला. कोल्हापूर ही त्यांची जन्मभूमी आणि कर्मभूमीही. त्यांनी 'जननी जन्मभूमीश्च स्वर्गादपि गरियसी' याप्रमाणे जननीसाठी जन्मभूमी सोडली नाही. प्रसिध्दी पराङ्‌मुख असलेला त्यांचा संकोची, अतिशय सालस स्वभाव, मंदस्मित हे त्यांचे वैशिष्ट्य. थोडक्यात सांगायचं तर देवमाणूस. आयुष्याच्या ७२ वर्षाच्या प्रवासात त्यांनी कोल्हापूर या कलानगरीत अनेक माणसे जोडली, वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या स्तरावर कामं केली. लेखन आणि वाचन कार्यात ते सदैव रमलेले असायचे. सामान्य कुटुंबात जन्माला आलेलं एक असामान्य व्यक्तिमत्व असं म्हंटलं तर त्यांच्याबाबतीत ते वावगं ठरणार नाही.

## डॉ. खांडेकरांची शैक्षणिक वाटचाल -

मराठी हा स्पेशल व मानसशास्त्र विषय घेऊन १९४९ साली मुंबई विद्यापीठातून बी.ए. ऑनर्स ही पदवी घेतलेल्या खांडेकरांनी १९५३ ला पुणे विद्यापीठातून मराठी, इंग्लिश घेऊन एम.ए. ची पदवी संपादित केली. म्हणजे केवळ मराठीच नव्हे तर मानसशास्त्र हाही त्यांचा आवडीचा विषय होता. तर इंग्रजीवर त्यांचे विशेष प्रभूत्व होते. १९७१ साली शिवाजी विद्यापीठातून त्यांनी 'मराठी पोवाडा' या विषयावर पी.एच.डी. मिळवली.

## व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू -

डॉ. सूर्यकांत खांडेकरांनी १९४९ साली ट्यूटर म्हणून कामास सुरूवात केली. त्यांनी १९४९ ते ५१ या काळात राजाराम कॉलेज कोल्हापूर येथे ट्यूटर म्हणून काम पाहिले. १९५१ ते ५७ पर्यंत सहाय्यक शिक्षक म्हणून काम केले तर १९५७ नंतर कॉमर्स कॉलेज, कोल्हापूर, राजाराम कॉलेज, कोल्हापूर, कर्मवीर भाऊराव कॉलेज, इस्लामपूर, शाहू कॉलेज, कोल्हापूर, बळवंत कॉलेज, विटा येथे अधिव्याख्याता

म्हणून काम केले. १९७३ ते १९७९ मध्ये न्यू कॉलेज कोल्हापूर येथे मराठीचे विभाग प्रमुख म्हणूनही त्यांनी काम पाहिले.

१९७९ साली शिवाजी विद्यापीठात पी. एच.डी मार्गदर्शक म्हणून काम करत असताना इतरही विविध विद्यापीठामध्ये वेगवेगळ्या स्तरावर काम करून त्यांनी आपल्या प्रतिभेची चुणूक दाखवून दिली व अनेक विद्यार्थी घडविले जे आज विविध क्षेत्रात मोठमोठ्या पदांवर कार्यरत आहेत.

## डॉ. खांडेकरांचे प्रसिध्द काव्यसंग्रह व त्यांना मिळालेले पुरस्कार

डॉ. खांडेकरांचे 'सावली' व 'पानफूल' हे दोन काव्यसंग्रह प्रसिध्द आहेत. त्यांच्या 'सावली' या पहिल्या कविता संग्रहात एकूण ७१ कविता संग्रहीत केल्या आहेत. या कवितासंग्रहाला डेक्कन व्हर्नाकुलर ट्रान्सलेशन सोसायटी, पुणे व इचलकरंजी एज्युकेशन ट्रस्ट, इचलकरंजी यांचे मार्फत दिले जाणारे पुरस्कार मिळाले आहेत.

त्यांचा 'पानफूल' हा दुसरा कविता संग्रह असून त्यात ७९ कविता संग्रहित केल्या आहेत. उत्कटता, भावुकता, अचूक व समर्थ शब्दकळा ही त्यांच्या कवितेची खास वैशिष्ट्ये या काव्यसंग्रहात जाणवतात. निसर्गाच्या विविध रंग रुप छटा त्यांच्या कवितेतून प्रतिबिंबित होताना दिसतात.

डॉ. खांडेकर हे बहुमुखी प्रतिभेचे धनी असल्यामुळे त्यांनी जितक्या समर्थपणे, निसर्गकविता, प्रेमकविता लिहिल्या तितक्याच समर्थपणे त्यांनी बालकांचे बालविश्वही हळूवारपणे उलगडून दाखविले व बालसाहित्यात मोलाची भर घातली. त्यांचे 'छुमछुम' व 'चिमणे पंख' हे दोन बालगीतांचे संग्रह प्रसिध्द आहेत. त्यांच्या 'छुमछुम' या संग्रहात एकूण ३५ बालगीतांचा समावेश केलेला आहे. या संग्रहाला महाराष्ट्र शासनाचे १९६०-६१ चे उत्कृष्ट बालवाङ्‌मयाचे पारितोषिक मिळाले आहे. त्यांच्या 'चिमणे पंख' मध्ये एकूण २२ बालगीते समाविष्ट केली आहेत.

खांडेकरांच्या ममतामय हृदयातून स्फुरलेली व सिध्दहस्त लेखणीतून उतरलेली ही बालगीते निश्चितच बालकांना आनंद देतील अशी आहेत. बालमनावर सुसंस्कार करण्याचे सामर्थ्य या बालगीतांत खास आहे.

## डॉ. सूर्यकांत खांडेकरांचे मराठी कवितेतील योगदान -

डॉ. सूर्यकांत खांडेकरांनी मराठी कवितेत मोलाची भर घातली आहे. प्रेमकविता, निसर्गकविता, बालकविता संपादन, स्फूटलेखन अशा सर्वच प्रकारात त्यांनी लेखन केले आहे.

कवीवर्य खांडेकरांनी कवितेच्या सर्वच अंगांना स्पर्श केलेला आहे. त्यात प्रेम व निसर्ग हे विषय जरी अधिक येत असले तरी कवींने लिहलेल्या इतर कविताही वाचनीय आहेत. जीवनात येणारे इतर सुख-दुःखाचे प्रसंग, आई-वडिलांच्या विषयीचे प्रेम नात्यातील जिव्हाळा याविषयी कवीच्या कित्येक कविता विचार-प्रधान आहेत. आप्तांच्या काही वेळा नकोसा होणारा दुरावा कर्तव्य करीत असताना त्यांच्या आठवणीने व्याकूळ होणारे कवीचे मन आपल्या मनाला चांगलेच स्पर्श करून जाते.

खांडेकरांच्या कवितेत प्रेम, निसर्ग आणि वास्तव या भावनांचा सुरेख संगम बघावयास मिळतो. याबरोबरच काही आध्यात्मिक कवितांची त्यांनी निर्मिती केली आहे. त्यांच्या आध्यात्मिक कविता वाचत असताना आपण एका चिंतनशील रसज्ञ तत्त्वज्ञानाच्या सानिध्यात आहोत असे वाटते.

डॉ. खांडेकरांनी निसर्गाच्या साक्षीने रंगवलेली प्रेमकविता अत्यंत महत्वाची वाटते. खांडेकरांच्या उत्कट व्यक्तिमत्त्वाचा उस्फूर्त आविष्कार त्यांच्या कवितेत दिसून येतो. त्यांची कविता म्हणजे विचार, भावना, संवेदना, कल्पना, शब्द, नाद यांचा एक चढता आलेख आहे.

'छुमछुम' आणि 'चिमणेपंख' हे त्यांचे दोन बालकवितांचे संग्रह आहेत. त्यात लहान मुलांना चटकन समजणाऱ्या, प्रेरणा देणाऱ्या संस्कारक्षम अशा कवितांची निर्मिती कवीने केली आहे. हे दोन्ही कवितासंग्रह जितके १९६०-६१ ला प्रेरणादायी ठरले तितकेच आजही प्रेरणादायक ठरले आहेत.

डॉ. खांडेकरांनी एकूण पाच चित्रपटांसाठी गीतांचे लेखन केले आहे. थोरातांची कमळा, मुकं लेकरू, नवरा म्हणू नये आपला, माझी जमीन, गोकुळचा राजा इत्यादी चित्रपटांसाठी गीते लिहिली आणि ती अफाट लोकप्रियही झाली आहेत. त्यांच्या या गीताने तर अख्ख्या महाराष्ट्राला वेड लावले आहे.

स्वतंत्र काव्यनिर्मिती बरोबरच खांडेकरांचे संपादन कार्यही मोलाचे आहे. त्यांनी मराठीतील अक्षय ग्रंथ ज्ञानेश्वरीच्या पहिल्या, दुसऱ्या व बाराव्या अध्यायाचे संपादन केले आहे. त्याचबरोबर मराठीतील प्रतिथयश लेखकांच्या ग्रामीण कथांचेही संपादन केले आहे. यातून त्यांच्या संपादनकौशल्याचे ही दर्शन घडते.

## डॉ. सूर्यकांत खांडेकर यांची चित्रपट गीते

प्रेमचिंतनापासून तत्त्वचिंतनापर्यंत प्रवास करणाऱ्या खांडेकरांनी 'थोरातांची कमळा', 'गोकुळचा राजा', 'नवरा म्हणू नये आपला', 'मुकं लेकरू' आणि 'माझी जमीन' या चित्रपटांसाठी गीतांच लेखन केल.

खांडेकरांच्या शब्दप्रभुत्वाचं वैशिष्ट्यच हे की चित्रपटासाठी कोणत्याही प्रकारच्या गीताची मागणी असली तरी ते लिहू शकत ते कधी प्रेमगीत असायचे तर कधी द्वंद्वगीत, कधी विरहगीत असायचे तर कधी भक्तिगीत. गीत कसलेही असले तरी गीतासाठी खांडेकरांना शब्द सुचले नाहीत असं त्यांच्या बाबतीत कधीही घडलं नाही. चित्रपट गीतांचं लेखन करताना मागणीबरहुकूम गीतं लिहण्याचा, आधी चाली बांधून त्यावर गीतं लिहण्याचा प्रसंगही काहीवेळा खांडेकरांवर आला. परंतू, ही गोष्ट त्यांना यत्किंचितही कमीपणाची वाटली नाही,

उलट त्यांच्यातील गीतलेखकाला ते आव्हानच वाटायचे त्या आव्हानाला आपल्या अभ्यासासह, संस्कारासह, शब्दप्रेमासह ते सामोरे जायचे.

चित्रपटातील प्रसंगाला अनुरुप गीतं लिहिताना खांडेकरांमधील भावकविता लिहिणारा कवी जागा होतो आणि

उमलली भावफुले हसरी
गूज लाजरे अंतरातले येते मम अधरी ।
रूप सावळे स्वप्नी येते
त्याच्यासह मी खेळ खेळते
हसते रुसते आणि लाजते
दिवसा रात्री स्मृती जुळविते क्षण ते जरतारी ५

असे मधूर भावगीत तयार होते.

खांडेकरांच्या चित्रपट गीतात गृहिणीच्या भावना व्यक्त करणारी गीते, भक्तीरसाने ओथंबलेली गीते, प्रेमगीते असे विविध प्रकार बघायला मिळतात. कृष्ण, गोपी, राधा, गोकुळ, रासक्रीडा या खांडेकरांच्या आवडत्या विषयांना चित्रपटातदेखील स्थान मिळाले आहे म्हणूनच

उष:काल जाहला गोकुळी
चराचरावर नाचु लागली सुवर्ण किरणावली ६
आणि
ये मुकुंदा राधिकेच्या राऊळी तू धावूनी
विकल झाली अधिर राधा बावरी रे श्रीहरी
क्षीण झाली दीन काया मी झुरे रे अंतरी
भेटसी केव्हा मुरारी येऊनी पक्षापरी
कुंज सारे धुंडुनीया श्रांत झाल्या गौळणी ७

अशातऱ्हेची गीतेही त्यांनी लिहिली आहेत. त्यांच्या सर्वच चित्रपटातील गीते विलक्षण लोकप्रिय झाली आहेत. त्यांच्या चित्रपटातील गीतांनी एकेकाळी तरुण

पिढीला भुरळ घातली होती. आज ती पिढी बदलली असली तरीही गाणी तितक्याच आवडीने ऐकली जातात.

खांडेकरांच्या गीतांना सिध्दहस्त संगीतकारांच्या संगीतरचनांचा स्पर्श झाला. आशा भोसले, उषा मंगेशकर, सुधीर फडके, सुमन हेमांडो अशा समर्थ गायकांकडून त्यांची गाणी गाईली गेली आणि खांडेकरांच्या गीतातली सहजसुलभ सोपी रसाळ भाषा रसिक तात्काळ गुणगुणू लागले आणि त्यांची गाणी घराघरात पोहोचली. या गीतांमधील ताजेपणा, रचनेतला सोपेपणा रसिकांच्या मनाला जाऊन भिडला. त्यामुळेच ती लोकप्रिय झाली.

खांडेकरांचे शब्द नादाला आणि लयीला बरोबर घेऊनच जन्माला आले आहेत. त्यांच्या शब्दप्रेमी समृध्द व्यक्तिमत्त्वातून साकारलेली ही गीते म्हणजे रसिकांना मिळालेला आनंदाचा ठेवा आहे. त्यांच्या गीतात अनुभव समृध्दीचे सामर्थ्य आहे ; आणि प्रासादिकतेमुळे ती रसिकांच्या मनावर वर्षानुवर्षे राज्य करीत आहेत. या गीतांमधील शब्दांमुळे, या शब्दांच्या लयीमुळे, मोहक चालीमुळे आज खांडेकरांना मानाचे स्थान मिळाले आहे हे मान्य करावेच लागेल.

## निष्कर्ष –

डॉ. सूर्यकांत खांडेकर आणि मराठी कविता या प्रकरणात खांडेकरांच्या जीवनकार्याचा थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे. त्याबरोबर आधुनिक मराठी कवितेतील प्रातिधिनिक कवी म्हणून बा. सी. मर्ढेकर, नारायण सुर्वे, दिलीप चित्रे, यांची थोडक्यात माहिती देण्यात आली आहे.

डॉ. खांडेकरांचा जन्म, मृत्यू , नोकरी त्यांचे काव्यक्षेत्रातील योगदान, संपादन कार्य, बालसाहित्य, चित्रपट गीते या सर्व बाबींचा आढावा या प्रकरणात घेण्यात आला आहे.

# प्रकरण १ ले

## संदर्भसूची

१. प्रदक्षिणा खंड २ रा पृ.९

२. मर्ढेकर बा.सी. - काही कविता पृ.२१

३. सुर्वे नारायण - सनद पृ.११

४. सत्यकथा - १९६७ पृ .१०

५. डॉ.खांडेकर सूर्यकांत - त्या फूलांच्या गंधकोषी पृ.४५

६. तत्रैव पृ.२०

७. तत्रैव पृ.३०